मारणारे हात त्यांचे आवरा हो
बोचणारे शब्द त्यांचे आवरा हो ।१
चालती मस्तीत कोणी यौवनांच्या
जात आहे तोल त्यांचा सावरा हो ।२
नजर त्यांची सांगते ही प्रीत जेव्हा
चेहरा ही भावनांनी लाजरा हो ।३
पेटलेले वाद येथे हे सदाचे
थांबवाया मग पुढे तू ये जरा हो।४
टोमणे मारून ते घायाळ करिती
घालतो त्यांना कुणी बघ भरा हो ।५
साहतो लाटांत सागर कोंडमारा
लोक सारे त्यास म्हणती का हरा हो ॥६॥